३८० म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
वा. क्र. १८५
१८६१०

मराठी ग्रं[illegible] संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/ वाचनालय/ जिल्हा वाचनालय शाखा.

| | | |
|---|---|---|
| अनुक्रम नं. १८५७ | विभाग काव्य | क्रमांक १८५ |

पुस्तकाचें नांव अर्धसहज बोध
लेखक रामचंद्र सदाशिव राजाध्यक्ष
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं न[illegible]

३८०
काव्य

. ग्रं. सं. ठाणें.
वि. काव्य
क्र. नं.

# ... न बोध

( प्राकृत ओवी बद्ध )

अनु 380

हा

ग्रंथ

श्रीठाकुरदास बावा यांनी केला

तो

रामचंद्र सदाशिव राजाध्यक्ष

यांनीं

लोक कल्याणार्थ

प्रसिद्ध केला.

शके १७९३ सन १८७१

( ह्या पुस्तकाचा सन १८६७ चा आक्ट २५
प्रमाणें हक्क नोंधला आहे. )

किंमत साहा ६ आणे

मुंबई एथें
गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत एक्झिक्युटर्स यांचे
हुकुमावरून नारो कृष्ण दुमाळे यांणीं छापिला.

अर्थ १८५

# प्रस्तावना.

या महाराष्ट्र देशामध्यें आत्मानात्मज्ञानसंपन्न प्रसिद्ध कवि एकनाथ, ज्ञानेश्वर, श्रीधर, आदिकरून जगद्विख्यात साधु झाले. त्यांनीं प्राकृत जनांस सदसद्बोध प्राप्ति व्हावी ह्मणून, परम गहन वेदांत शास्त्राचें मंथन करून, लोकहितार्थ महाराष्ट्र भाषेंत मोठमोठे ग्रंथही केले; परंतु ते अति विस्तृत असल्यामुळें, त्यांचें साद्यंत अवलोकनच होणें कठीण. मग त्यांतील प्रतिपादित विषयांचें ज्ञान व धारणा हीं होणें परम दुर्धर होय; यास्तव प्रसिद्ध साधु ठाकुरदास बावा यांनीं, जनां-

स आत्मबोध अनायासें व्हावा, या हेतूनें "सहजबोध" नामक लाहानसा ओंवीबद्ध ग्रंथ शके १७२७ त केला.

या ग्रंथाचीं त्यांनीं एकंदर नऊ प्रकरणें (भाग) केलीं आहेत. त्या प्रत्येकांत क्रमशः मंगलाचरण, त्रिपद (महावाक्य) विचार, स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण, या चार देहांचें निरसन ह्मणजे आत्मस्वरूपापासून मिथ्यात्वें करून प्रतिपादन, अभ्यासयोग, स्थितिवर्णन, आणि सद्गुरुवर्णन, यांचें सुबोधरीत्या उत्कृष्ट वर्णन केलें आहे. यास्तव या ग्रंथापासून जनांस अनायासें ज्ञानप्राप्ति खचित होईल, असें समजून, आह्मी याच्या प्रति महत्प्रया-

सानें मिळवून, विद्वान् व हरिभक्तिपरायण वे० रा० जगन्नाथबावा व कासिनाथशास्त्री यांच्यासाह्यानें शुद्ध करून हा ग्रंथ छापून प्रसिद्ध केला आहे. यांत नजर चुकीनें जे दोष राहिले असतील, त्यांजकडे लक्ष्य न देतां, यांतील बोधरसच सुज्ञजन ग्रहण करतील अशी आह्मी आशा करितों.

# सूचना

हा ग्रंथ वर सांगितलेले साधु ठाकुरदास बावा यांचे चिरंजीव हरिभक्ति परायण वे० रा० जगन्नाथबावा यांणीं आह्मास कृपाकरून प्रसादिक वस्तु ह्मणून देऊन लोकोपकारार्थ छापून प्रसिद्ध करायास सांगितला, तो आह्मी आभारपूर्वक स्वीकारून छापिला आहे.

हें पुस्तक डिसेंबर महिन्याचे पंधरावे तारखेच्या आंतच वर्गणीदारांस मिळेल ह्मणून सूचविलें होतें, परंतु कांहीं दिवस अधिक लागले याविषयीं त्यांणीं क्षमा करावी.

# श्लोक

सहजत्वाच्छरीरेस्मिन्महदारोप्यतेऽनुधैः ॥ तस्मात्सहजधर्मेभ्यश्चातिरिक्तमितीर्यते ॥ १ ॥

# अनुक्रमणिका.


| प्रकरणें | पृ. |
| --- | --- |
| मंगलाचरण | १ |
| त्रिपद विवरण | ७ |
| स्थूलदेह निरसन अथवा गुरुशिष्य संवाद | ११ |
| लिंगदेह निरसन | १४ |
| कारणदेह निरसन | १९ |
| महाकारणदेहनिर० | २५ |
| अभ्यास योग कथन | २८ |
| स्थितिवर्णन | ३४ |
| श्रीगुरुवर्णन | ३९ |

९१०५
२१२

# अथ सहजबोध ग्रंथ प्रारंभ

॥ श्रीगणेशायनमः ॥

ओंनमोजीसहजा॥ऐसेंह्मणोंतरीकेंचा
दुजा॥ एकींएकपणेंविणनिजा ॥दावि
शीवोजातुजतूंची ॥ १॥ तूंह्मणतांमीपण
स्फुरेजें ॥ तेंहीतुवांनहोऊनिजाणिजे॥
जाणिवानेणिवाप्रकाशिजे॥तुवांसहजें
सहजत्वें ॥२॥ ऐसेंजेंकांस्फुरण॥ तेंमूळ
मायेचेंलक्षण॥ तेथूनभासेअज्ञान॥त्या
चेंलक्षणबोलिजेल ॥३ ॥ सहजींस्फुर
लेंमीसहज॥तेंचिअनेकत्वाचेंबीज ॥ तें
कार्यकारणनिजतेज ॥ झालेंसहजस
हजेंची ॥ ४ ॥ सहजपणेंविणसहजअ
से ॥ तेथेंमीतूंहेंभासलेंकैसें ॥ हेंहीआ

पआपणातेंपिसें ॥ लागलेंअसेसहज
ची ॥ ५ ॥ अवस्थात्रयतिन्हीलोकजा
ण ॥ भासलेपरिनमोडेसहजपण ॥ जे
मीहेऐशीआठवण ॥नकरितांकोणस्फुर
तसे ॥६॥ सत्स्वरूपाचीआठवण ॥ तेंशु
द्धविद्येचेंलक्षण ॥विस्मरणतेंअज्ञान ॥
सहजींखूणजाणावी॥ ७॥ मिथ्याअज्ञा
नभासलें ॥ तेणेंसत्यासिवेडलाविलें ॥
मीकोणकैसाहेंनकळे ॥ स्फुरोंलागलें
मीदेह ॥ ८ ॥ ज्ञानाज्ञानविपरीत
ज्ञान॥ याचेंकीजेलविवेचन ॥ श्रोतीं
व्हावेंसावधान ॥ निजींनिजपणपावा
वया ॥ ९ ॥ ऐसेंश्रीएकनाथआपण॥
करीतसेसहजपरमार्थकथन ॥ सकळ
शास्त्रांचेंमथन ॥ निर्वाणखूणतेदावी॥

॥ १० ॥ श्रीसद्गुरुपरंपरा ॥ मुळापासो
निअवधारा ॥ निरंजननिराधारा ॥
पासोनिविस्तारासांगिजेल ॥ ११ ॥
झालाआदिनारायण ॥ तेणेंविधिबो
धिलाजाण ॥ तेथूनअत्रिऋषीसिखु
ण ॥ बाणलीसंपूर्णसहजनिज ॥ १२ ॥
तेणेंदत्तात्रेयासगुज ॥ सांगीतलेंजेंनि
जसहज ॥ जेकांपरमार्थाचेंनिज ॥
सारबीजआपणची ॥ १३ ॥ तेथूनिश्री
जनार्दना ॥ प्राप्तझालेंअसेजाणा ॥ ते
णेंएकनाथआपणा ॥ सुखार्थजाणा
नामठेविलें ॥ १४ ॥ जडमूढजेकांअ
ज्ञान॥ त्यांसितारावयालागिपूर्ण ॥ श्री
एकनाथनामाभिधान ॥ प्रकटजाण
झालेंसे ॥ १५ ॥ तेणेंश्रीसद्गुरुएकना

थें ॥ अतिदीनजाणोनिस्पृहातें॥मिथ्या
त्वेंवारुनिभवातें ॥ ठाकुरदासातेंसहज
ठेवा ॥ १६ ॥ तेंसहजपणव्हावयाजत
न ॥ श्रीजनार्दनाचेंनामजाण ॥ सांगि
तलेंसेनिजधन ॥ एकींएकपणनिरसो
नी ॥ १७ ॥ श्रीनाथजीकृपावंत॥ बो
लवीजोकांपरमार्थ ॥ सकळमुमुक्षुज
नाचेंआर्त॥पुरवीनिजस्वार्थसहजची॥
॥ १८ ॥ आतांतेंचिबोलिजेल ॥ जेणें
मुमुक्षुतरतील॥ साधकांचेंसाध्यफळ॥
सहजनिखळसिद्धांसी ॥ १९ ॥ तरी
ज्ञानह्मणिजेआत्मस्मरण ॥ मीब्रह्मआ
हेंअद्वयपूर्ण ॥ ऐसेंह्मणणेंअज्ञानपण॥
झालेंजाणसहजची ॥ २० ॥ मीब्रह्म
ऐसेंनह्मणतां ॥ सहजब्रह्मचिआहेआ

इता ॥ तेथेंमीब्रह्मपणेंस्फुरतां ॥ झाली
तत्वतांमूळमाया ॥ २१ ॥ मायाह्मण
जेआपलीकल्पना ॥ तेचिद्विविधझा
लीजाणा ॥ सत्स्वरूपाचियास्मरणा ॥
ज्ञानाभिधानातेचिझाली ॥ २२ ॥ ते
चिझालीअज्ञान ॥ आपआपणांविस
रून ॥ मगकल्पिलाप्रपंचजाण ॥ विप
रीतज्ञानयानाव ॥ २३ ॥ त्याविपरी
तज्ञानाचेपोटीं ॥ एकसरांभासलीसृ
ष्टी॥निद्रालागतांचिउठाउठी॥स्वप्नको
टीमिथ्यापैं ॥ २४ ॥ त्याचेंव्हावयानि
रसन ॥ जागृतीचवोखदजाण ॥ तेवीं
अज्ञानाचेंखंडण ॥ निजात्मज्ञानेंकरी
तसे ॥ २५ ॥ ज्ञानदानींश्रीगुरुराणा ॥
त्यासिभावेंशरणजाणा ॥ ज्ञावेंखंडाव

याजन्ममरणा ॥ निजात्मज्ञानालागु
नी ॥ २६ ॥ ज्ञानदानीअतिउद्दार ॥
श्रीसद्गुरुहानिर्धार ॥ आगमनिगमींअ
पार ॥ महिमाथोरवर्णिला ॥ २७ ॥
त्याचेंकरावयास्तवन ॥ वेदवाणीमौ
नावलीजाण ॥ ह्मणूनधरियेलेचरण॥
मौनाचेंमौनगुरुनाम ॥ २८ ॥ ऐशि
यासद्गुरुराया॥शिष्यविनंतीकरावया॥
भवसिंधुतरावया ॥ लागोनिपायांवि
नतजो ॥ २९॥ त्याचेजेजेमनोरथ ॥
तेतेपुरवूनिकरीस्वस्थ ॥ ऐसाजोकांअ
नाथनाथ ॥ तोश्रीएकनाथवंदिला ॥
॥ ३० ॥ मगपुशिलेंजेस्वामी ॥ कोण
कोठीलकैसामी ॥ देहमीमानोनझालों
श्रमी ॥ भवभ्रमींबुडतसें ॥ ३१ ॥ ऐसें

ऐकूनसद्गुरुराजें ॥ उत्तरदेतसेसहजास
हजें ॥ आपआपणातेंजाणिजे ॥ जे
णेंतेंकीजेआतांची ॥ ३२ ॥ हेंऐकोनि
शिष्यशिरोमणी ॥ चमत्कारलाअंतः
करणीं ॥ सर्वांगाचेकानकरोनी ॥ स
हजश्रवणींसादर ॥ ३३ ॥ इतिश्रीस
हजबोधे ॥ गुरुशिष्यसंवादे ॥ ठाकुरदा
सअभेदछंदे ॥ स्वानंदकंदेंरचीनिज ॥
॥ ३४ ॥ इतिसहजबोधेमंगलाचरणं
नामप्रथमप्रकरणंसमाप्तं ॥ १ ॥ ॥ ७ ॥

---

श्रीएकनाथायमनः ॥ शिष्येंकेलाजोप्र
श्न ॥ त्याचेंकरावयासमाधान ॥ बोलवी
लश्रीनाथआपण ॥ श्रोतेसावधानसहज
तेणें ॥ १ ॥ आतांमहावाक्याचाविचार ॥

बोलेअबोलण्याचानिर्धार ॥ कळेजेणें
साचार॥भवसिंधुपारपावाया॥२॥ तरी
मीआहेंहेंतोजाणशी॥परीमीदेहऐसेंमा
निशी ॥ तोमिथ्याभ्रमतुझातुजशीं॥आ
पआपणासीविचारीपां ॥ ३ ॥ आधी
करावेंत्रिपदशोधन ॥ तेंहीशबलशुद्ध
असेजाण॥ त्वंपदतत्पदाचेंलक्षण॥ आ
धींविवेचनकरावेंपैं ॥४॥ मगअसिपदीं
ऐक्यसहज॥आपेआपजाणशीनिज ॥
निजींनिजपणावीणगुज ॥ सहजींसह
जसिद्धलाभे ॥ ५ ॥ तरीतत्पदलक्षणजेई
श्वरु॥ त्वंपदजीवनिर्धारु॥ देहींचऐक्य
निरंतरु ॥ तेंचिसाचारुअसिपद ॥ ६ ॥
तेंचितत्पदत्वंपद ॥ दोहींचेशबलशुद्धभे
द ॥ सांगोंकरूनिविशद ॥ जेणेंनिजा

 ३०५ १८५

त्पदग्रामहोय ॥ ७ ॥ ब्रह्मांडहिरण्यग
र्भमाया॥चौथादेहमहामाया॥ उत्पत्ति
स्थितिसंहारसर्वसाक्षिणीया॥ अवस्था
त्रयाजाणतूं ॥ ८॥ ब्रह्माविष्णुआणिरु
द्र ॥ चौथाअभिमानीसर्वेश्वर ॥ हात
त्पदाचाविचार॥ जाणिजेसारजाणाव
या ॥ ९ ॥ ऐसाजोसर्वेश्वर ॥ तोचि
जाणिजेपरात्पर ॥ ज्यासिनाहींपारा
वार ॥ निजनिर्धारसहजपणें ॥ १०॥
सर्वज्ञपणाचाअभिमान ॥ नाहींतेंशुद्ध
तत्पदाचेंलक्षण ॥ ज्ञानाज्ञानाचेंदीपन
॥ सहजींसहजपणनसेजेथें ॥ ११ ॥
याचपरीत्वंपदशोधन ॥ झालियानुरे
भेदभान ॥ प्रपंचाचेंमिथ्यापण ॥ प्रत्य
याजाणयेतसे ॥ १२ ॥ आतांत्वंपदा

चाशोध ॥ तोकरूनिदाऊंविशद ॥ जे
णेंभवभ्रमाचाखेद ॥ जाऊनिस्वानंदघ
नप्रगटे ॥ १३ ॥ तरीस्थूळसूक्ष्मकारण॥
जागृतीस्वप्नसुषुप्तीघन॥ चौथादेहमहा
कारण ॥ तूर्याजाणचौथीते ॥ १४ ॥
विश्वतैजसप्राज्ञयांतें॥ प्रत्यगात्माअभि
मानीबोलिजेतें ॥ आधीवोळखावेंला
गेनिरुतें॥तेणेंलक्ष्यांशातेंपाविजे॥ १५॥
बोलिजेतोतितुकावाच्यांश ॥ अनुभव
घेणेंतोलक्ष्यांश॥ लक्ष्यविरालियासाव
काश ॥ अंशीअंशसहजची ॥ १६ ॥
ऐसेंदोंहींपदींचेंविवरण ॥ करितांशुद्ध
लाभेपरिपूर्ण ॥ नुरेकाहींद्वैतजाण ॥ स
हजसमाधानयानावें ॥ १७॥ ऐसावि
चारनकरितां ॥ जेंजेंकीजेत्याणेंसार्थ

कता ॥ नव्हेचिकोठीकल्पभ्रमतां ॥ नि
जहितार्थानपवेची ॥ १८ ॥ ह्मणोनि
आधीआपणातें ॥ जाणावेंमगतयातें॥
अभ्यासावेंकवणेरीतीनें ॥ तेंचिनिरुतें
सांगेन ॥ १९॥ इतिश्रीसहजबोधे ॥ गु
रुशिष्यसंवादे ॥ ठाकुरदासविनोदें ॥
अभेदपदेंनिजदावी ॥ २०॥ इतित्रिपद
विवरणंनामद्वितीयप्रकरणंसमाप्तं ॥२॥

---

श्रीएकनाथायनमः॥ मीमीऐसेंह्मणतो
सी ॥ परीमीकोणऐसेंनेणसी ॥ तरीतु
झातुजसी ॥ निजमानसींविचारीपां
॥ १ ॥ मीदेहासबाह्यव्यापुनी ॥ ऐसें
तोदेहकैसेनी ॥ देहजडहेंजाणोनी ॥
आत्माआत्मपणींवोळखावा ॥ २ ॥दे

हतोंपंचभौतिक॥तोविवेकसांगोंएक ॥
गगनवायुतेजउदक ॥ पृथ्वीहेवोळख
पांचवी ॥ ३ ॥ यापंचभूतांचेअंश ॥
जाणावेतेपंचवीस ॥ रोमत्वचानाडीअ
स्थिमांस ॥ धरणीआभासजाणावा ॥
॥ ४ ॥ लाळमूत्रमज्जारेत ॥ पांचवेंतें
जाणशोणित ॥ हेंआपापासोनिद्रवत॥
यातेंजोजाणतवेगळातो ॥ ५ ॥ क्षुधा
तृषाआळस ॥ निद्रामैथुनहेअंश ॥ ते
जापासोनिभास ॥ जाणेंसावकाशयां
तेंतूं ॥ ६ ॥ चलनधावननिरोधन ॥ प्र
सरणआणिआकुंचन ॥ वायूचेअंश
पांचपूर्ण ॥ जाणेसंपूर्णयांशितूं ॥ ७ ॥
कामक्रोधशोकलोभ ॥ भयहाआका
शक्षोभ ॥ यांसजाणशीतूंसहजस्वयं

भ॥ नहोऊनियांनभनभांशतूं॥८॥ ज
न्ममरणादिषड्विकार॥ याशीचअसेसा
चार ॥ नामरूपाचाबडिवार॥ वर्णाश्र
माचारसर्वही ॥ ९ ॥ यासीचस्थळदे
हल्लणिजे ॥ याचीअवस्थाजागृतीजा
णिजे ॥ देहमीमानूनिस्फुरिजे ॥ विष
यभोगिजेइंद्रियद्वारां॥१०॥ यास्थूल
देहाचेंतानमान॥तेंतोंसर्वहीखंडज्ञान॥
याविरहितजोज्ञानघन ॥ तयाचेंमान
कोणकरी ॥ ११॥ विश्वाभिमानीस्थू
ळाचा ॥ भोगमानीसुखदुःखाचा॥ अ
वस्थाबुडालियातयाचा ॥ ठावोचिसा
चाउरेना ॥ १२॥ स्थूळभोगविश्वाभा
सु ॥ विश्वाभिमानीतोजाणिजेसु ॥
स्थूळनिरासींतयानासु ॥ होऊनिअ

विनाशुनिजउरे ॥ १३॥ हेंतूंसर्वजाण
शी॥तरीहेंचिकैसेनहोशी॥याचासाक्षी
मीऐशी॥ प्रचितीतुजसिअसेकीं॥१४॥
याकारणेंस्थूळदेह ॥ तूंनहोसीहेंनिःसं
देह ॥ सहजआहेसिविदेह ॥ दारापुत्र
गेहतुजनाहीं ॥ १५ ॥ यापरीस्थूळा
चानिरास ॥ करूनिजाणिजेअविना
श ॥ श्रीसद्गुरूचीधरोनिकास ॥ देहमी
ऐसाभासनुरेमग ॥ १६ ॥ इतिश्रीसह
जबोधे ॥ गुरुशिष्यसंवादे ॥ ठाकुरदा
सासहजअभेदे ॥ ग्रंथानुवादेश्रीगुरू ॥
॥ १७ ॥ इतितृतीयप्रकरणंसंपूर्णं॥३॥

---

श्रीएकनाथायनमः ॥ स्थूळदेहहेंनिर
शिलें ॥ इतुकेनबंधनतुटलें॥ ऐसेंह्मणो

नयेउरलें ॥ जेणेंदाविलेंस्थूळहें ॥ १ ॥
त्यालिंगदेहाचानिरासजेणें ॥ होयतें
आतांबोलणें ॥ कीजेलशुद्धअंतःकर
णें ॥ सावधपणेंपरिसावें ॥ २ ॥ तरी
परिसाआतांविचार ॥ तोबोलिजेतसे
सविस्तर ॥ जेणेंबोधेंअंतर ॥ परात्परपा
वावया ॥ ३ ॥ श्रोत्रत्वचाचक्षुरसना ॥
घ्राणहींज्ञानेंद्रियेंजाणा ॥ यांतेंजाणेत्या
आपणा ॥ सहजींसहजपणानिरसो
नी ॥ ४ ॥ वाचापाणीआणिपाद ॥ तैसें
चशिश्नआणिगुद ॥ कर्मेंद्रियेंहींपंचवि
ध ॥ यांतेंविशदजाणशीतूं ॥ ५ ॥ प्रा
णापानउदान ॥ तैसेचिव्यानसमान ॥
हेंपंचविधवायूचेंलक्षण ॥ क्रियासंपूर्ण
घडेयेणें ॥ ६ ॥ शब्दस्पर्शरूपरसगंध ॥

हाविषयपंचकाचाजाणभेद ॥ यासि
जाणशीतूंनिजानंद॥ जोनिर्द्वंद्वसर्वदा॥
॥ ७ ॥ अंतःकरणबुद्धिमन ॥ चित्तअ
हंकारहेंस्फुरण॥ कल्पनेचाविस्तारजा
ण ॥ साक्षीआपणसहजअसे ॥ ८ ॥
प्रथमवृत्तीचेंस्फुरण ॥ तेंचिजाणिजेअं
तःकरण ॥ संकल्पविकल्पात्मकमन ॥
निश्चयात्मकजाणबुद्धीते ॥ ९ ॥ पदा
र्थाचेंजेंचिंतन॥वृत्तिकरीतेंचित्तजाण॥
मीपणेंजेंकांस्फुरण ॥ तेंचितूंजाणअहं
कारु ॥ १० ॥ ऐसाहापंचप्रकारु॥ ए
कवृत्तीचाविस्तारु ॥ याचाआदिअंत
निर्धारु ॥ जाणेंसाचारुसहजतूं॥ ११॥
याशिह्मणिजेलिंगदेह ॥ऐसेंजाणेतोचि
विदेह॥ निश्चयबाणलियानिःसंदेह॥देह

विदेहदोन्हींनाहीं॥ १ २॥ याचिस्वप्नाव
स्थाजाण॥तरीतिचेंहीआतांलक्षण॥वि
स्तारकरोनिसांगेन ॥ वेगळेपणदिसेजे
णें ॥ १ ३ ॥ स्थूलभोगजोजोकाहीं ॥
दृष्टश्रुतादिसर्वही ॥ वासनेमाजीराहि
लापाही ॥ भासेठायींस्वप्नतें ॥ १ ४ ॥
तैजसअभिमानीतेथिंचा ॥ अभिमान
लिंगस्वप्नाचा॥अंशविपरीतज्ञानाचा ॥
निरासत्याचासांगेन ॥ १ ५ ॥ स्वस्वरू
पातेंविसरून ॥स्फुरेजेंजेंकांहींस्फुरण॥
तेंसर्वहीविपरीतज्ञान ॥ दृश्यदर्शनसर्व
ही ॥ १ ६॥ काल्पनिकदेवकल्पिला ॥
तोकल्पनेनेंचदेखिला ॥ कल्पनेसवेंच
भंगला ॥ सत्यत्यालाह्मणोंनये॥ १ ७॥
स्थिरकरावयालागुन॥ स्थूळसूक्ष्मामा

जीजेखूण ॥ दाखवितीमुद्रालावुन ॥तें
संपूर्णमिथ्यापैं ॥ १८ ॥ अंगुष्ठप्रमाण
लिंगदेह ॥ वर्णिलातोयमगेह॥ वामकु
क्षीनिःसंदेह॥ वसवीस्नेहस्थूळींजया॥
॥१९॥ तोयातनादेहजाण ॥ यमदंडी
त्यालागुन॥ तेनेत्रींदावितीखूण॥ अज्ञा
नपूर्णजाणावें ॥ २०॥ श्वेतरक्तादिवर्ण
जे॥ तेसत्वादिगुणजाणिजे॥ नेत्रींखूण
दावितीजे॥तयाह्मणिजेपाखांड॥२१॥ने
त्रींदिसेतेंदृश्य॥ कल्पनाकल्पीतोभास॥
हेंदेखेतोद्रष्टात्यास ॥ दृश्यभासह्मणूंन
ये ॥२२॥ लिंगदेहवासनामय ॥ तेचि
स्वप्नावस्थाहोय॥तैजसाभिमानीठाय॥
कल्पनाआमयहोऊनी॥२३॥ लिंगदे
हअवस्थास्वप्न ॥ तैजसाभिमानीपासु

न ॥ वेगळातोसाक्षीआपण॥ सहजखू
णजाणावी ॥२४॥ इतिश्रीसहजबोधे॥
गुरुशिष्यसंवादे ॥ ठाकुरदासस्वानंदे ॥
सूक्ष्मभेदेविणअसे ॥२५॥ इतिलिंगदे
हनिरसनंनामचतुर्थप्रकरणंसंपूर्ण ॥४॥

---

श्रीएकनाथायनमः ॥ यास्थूळसूक्ष्मा
तेंजाणे ॥ परीमीकोणऐसेंनेणे ॥ अज्ञा
नऐसेंह्मणणें ॥ याचिकारणेंभ्रांतासी॥
॥ १ ॥ तेंअज्ञानकैसेरीती ॥ जायतेप
रिसायुक्ती ॥ सावधानव्हावेंचित्तीं ॥
ज्ञानप्राप्तीहोयजेणें ॥ २ ॥ दोंदेहांचा
साक्षीमीची ॥ परीमजमीनेणेची ॥ ऐ
सेंजाणेतोहितूंचि ॥ नेणीवकैंचीतुजपा
शीं ॥ ३ ॥ नजाणणेंहेंनेणीव॥ तिला

जाणेंतेंजाणिव॥मीनेणेंहामिथ्याभाव॥
जाणीवठावअज्ञाना ॥ ४ ॥ मजमीने
णेंजेंस्फुरें ॥ तेजाणीवचिकींवारे ॥ त
रीनेणीवतेंनुरे ॥ सहजडरेज्ञानपैं ॥५॥
नेणीवचिकारणदेह ॥ त्याचीसुषुप्तीअ
वस्थापाहें ॥ जोअभिमानधरोनिराहे
नामप्राज्ञहेंतयासी ॥ ६ ॥ कारणसुषु
प्तीप्राज्ञ ॥ केवळजाणअज्ञान ॥ याचें
जयासाक्षीपण॥ तोचिज्ञानघनआत्मा
॥ ७ ॥ ज्ञानघनतूंआहेसी ॥ नेणिवेतें
जाणशी ॥ याकारणेंतुजपाशीं॥ नेणि
वेशिठावनुरे ॥ ८ ॥ तेचिजाणीवसर्वां
भूतीं ॥ जाणेजागृतिस्वप्नसुषुप्ती ॥ तेचे
तनाऐशीख्याती ॥ अर्जुनाप्रतीहरिसां
गे ॥ ९ ॥ तेचिसप्तमाध्यायींदेवो॥ जी

चभूतामहाबाहो॥ऐसेंवर्णितोनिर्वाहो॥
त्याचानिर्णयोहोयतोऐका ॥ १० ॥
उर्ध्वमूलवृक्षाकार॥कांपुरुषवर्णिलेक्ष
राक्षर॥ तेसर्वहीजीवनिर्धार॥ त्याचा
विचारबोलिजेल ॥११॥ तेंहीअवस्थे
चेंजाणपण ॥ परीमीकोणहेंनाहींज्ञा
न॥ जीवदशेचीहेचिखूण॥ जीवनसं
पूर्णदृश्यभासा ॥ १२ ॥ दहाइंद्रियेंपं
चविषय ॥ मनसोळावीकळाहोय॥
सत्रावीजीवनकळाआहे॥ चेतनापा
हेतिचेंनाव॥ १३॥ यासोळाहीकळा
जाणे॥तयासिजीवनकळाऐसेंह्मणणें॥
जागृतीस्वप्नसुषुप्तीपाहणें ॥ ह्मणोनि
भासणेंअवस्थांसी ॥ १४ ॥ जागृती
स्वप्नअवस्थादोनी ॥ यांमाजीदेहमी

ऐसेंमानी ॥ तोजीवक्षरपुरुषध्वनीं ॥
बोलिलाजनींजनार्दन ॥ १५ ॥ देह
मीऐसेंमानित ॥ आकारतितुकानाशि
वंत ॥ मीचजन्मोनिमरत ॥ ऐसेंजो
भावितक्षरपुरुषतो ॥ १६ ॥ सुषुप्तीअ
ज्ञानघन ॥ मीदेहनाआत्मपण ॥ परी
त्यातेंहीप्रकाशून ॥ असेजाणअक्षरतो
॥ १७ ॥ मीदेहऐसेंमानावें ॥ तेणेंदेह
नाशींमरावें ॥ तेंकाहींनाहींतयाठावें ॥
ठेविलेंनावदेवेंअक्षरतया ॥ १८ ॥ पंच
भूतेंबुद्धिमन ॥ आठवाअहंकारजाण॥
हेअष्टधाप्रकृतीचीखूण ॥ देवेंसंपूर्णसां
गीतली ॥ १९ ॥ याहूनिपरदुसरीजे ॥
तीतेंजीवरूपाह्मणिजे ॥ अष्टधाभेदजा
णजे ॥ जगातेंधरिजेजाणपणें ॥ २० ॥

दोनीदेहतिन्हीअवस्था॥ यासर्वांचीजा
णेव्यवस्था॥ नेणेमीकोणहेकथा॥ जी
वभूताह्मणिजेते ॥ २१ ॥ यासर्वांतेंत
रीजाणे ॥ परीमीकोणहेंनेणे॥ तेचिजी
वरूपाजाणणें॥ जेणेंज्ञानेंज्ञानतें॥ २२॥
ऊर्ध्वमूलाकारजाण ॥ वृक्षमिसेंकेलेंव
र्णन ॥ त्याचेंमूळजेंअज्ञान ॥ त्याचेंछे
दनज्ञानशस्त्रें ॥ २३ ॥ एवंचेतनाजीव
भूता ॥ क्षराक्षरऊर्ध्ववृक्षता ॥ सत्रावी
जीवनता॥जाणतत्वताअज्ञानहें॥ २४॥
याइतुकियांचाद्रष्टापाहे ॥ तोज्ञानघ
नमीचिआहें ॥ ऐसेंआपआपणातेंहें ॥
जाणताहेतोप्रत्यगात्मा ॥ २५ ॥ तिहीं
अवस्थेंचेंज्ञान ॥ तेतूर्याअवस्थाहेखू
ण ॥ महाकारणदेहजाण ॥ कार्यकार

णजाणेजो ॥ २६ ॥ तोचिप्रत्यगात्मा
असे ॥ जोतिन्हीअभिमानीकसे ॥ हें
सांगोपांगजाणतसे ॥ अभिमानअसे
मीआत्मा ॥ २७ ॥ मीआत्मासर्वसा
क्षीपूर्ण ॥ हेचिप्रत्यगात्म्याचीखुण ॥ हे
चिअर्धमात्रासोहंजाण ॥ शुद्धस्मरण
हेंचिपैं ॥ २८ ॥ ओंकारयाशीचह्मणि
जे ॥ अपरोक्षज्ञानहेंजाणिजे ॥ असं
गत्वऐसेंबोलिजे ॥ यातेंसहजेंसहजप
णें ॥ २९ ॥ हेंशुद्धविद्येचेंलक्षण ॥ हें
चिशिवाचेंशिवपण ॥ हेंचिअविद्येचें
खंडण ॥ जीवपणनुरेजेणें ॥ ३० ॥ ठा
कुरदासाएकपणेंवीण ॥ ठेवीकृपाळूज
नार्दन ॥ जेथेंनाहींभिन्नाभिन्न ॥ तेंनि
र्वाणखूणबोलेन ॥ ३१ ॥ इतिश्रीसह

जबोधे ॥ गुरुशिष्यसंवादे ॥ अज्ञानखं
डिलेंस्वानंदे॥ सहजअभेदें निजींनिज॥
॥ ३२ ॥ ॥ इतिसहजबोधेकारणदेह
निरसनंनामपंचमप्रकरणंसमाप्तं ॥५॥

---

श्रीएकनाथायनमः॥ ज्ञानघनआत्मा
परिपूर्ण ॥ तोसच्चिदानंदमीआपण ॥ऐ
साजोवाहेअभिमान ॥त्याचाहीसाक्षी
जाणतूं ॥१॥ जेजेकाहींवृत्तिस्फुरे॥ ते
तूंजाणशीनिजनिर्धारें॥ निजींनिजप
णेंमगथारे ॥ तेहीबारेतूंचकीं ॥२॥ऐसा
ज्ञानाचाहीद्रष्टाजो॥ तोचिपरमात्माहें
जाणेजो॥ तथेंदृश्याकारभासेजोजो॥
होवोनिअसेजोआपणची ॥ ३ ॥ आ
काशींचउदकअसे ॥ त्यांतआकाशबि

वेजैसें ॥ दुजेंनहोनियांतैसें ॥ भासतसे
दुजेपण ॥४॥ जागणाचिपुरुषनिद्राव
शें ॥ आपआपणाविसरोनिजैसें॥एकीं
अनेकत्वदेखतसे॥भासैतसेंविश्वहें॥ ५॥
तेवीजागृतीमाजीनदिसे ॥ मगह्मणेमी
चएकाकीअसें ॥ तेहिविरालेयाअसेन
से ॥ विरोनिअसेसहजची ॥ ६॥ तेचि
आत्मविस्मृतीस्तव॥ मिथ्यासंसारभोगी
जीव ॥ तेगेलियाह्मणेमीदेव॥ तोहीभा
वनुरेमग ॥ ७ ॥ तेथेंएकनादुजेपण ॥
नाहींआहेह्मणेकोण ॥ सहजींसहजप
रिपूर्ण ॥ असेनिर्वाणनिर्जीनिज ॥८॥
नाहींजाणणेंनेणणें॥ काहींनहोणेंअस
णें ॥ तेचिवस्तुमात्रपणें ॥ दुजेनवीणप
रिपूर्ण ॥ ९ ॥ ऐसेंजेंकांशुद्धबुद्ध॥ तेंआ

पचिनिर्विवाद ॥ ज्ञानघनानंदशुद्ध ॥
भेदाभेदनसेतेथें॥ १०॥ शुक्लकृष्णनतेंह
रित॥नसेपीतनीललोहित॥ स्थानमान
मुद्रारहित॥असेनिजहितनीलपैं॥ ११॥
जेकांअखंडअमूप ॥ तेंसहजआपेआ
प॥ तेथेंनाहींपुण्यपाप ॥नुरेतापतयेठा
यीं ॥ १२ ॥ तेवींशुद्धज्ञप्तिमात्र ॥ स्व
प्रकाशसदास्वतंत्र॥ नलाभेचिमंत्रतंत्र॥
नानाविचित्रसाधनें ॥ १३ ॥ ह्मणोनि
सद्गुरूसिशरण ॥ निघालियाजन्ममर
ण ॥चुकोनिलाभेपरिपूर्ण ॥स्वानंदघन
प्रगटेपैं ॥ १४॥अद्वयसघनअनिर्वाच्य॥
विरोनिवाचकतावाच्य ॥ वचनेंविणअ
तिरुच्य ॥ सहजअशौचनिर्जीनिज ॥
॥ १५॥ सर्वभूतींसदासम ॥ शुद्धचैतन्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

आत्माराम ॥ निर्जीनिजपणाचाहीका
म ॥ विरोनिविश्रामसर्वांसी ॥ १६॥ ऐ
शीजेसहजस्थिती ॥ तेचिजाणासायु
ज्यमुक्ती ॥ हेचिपैंचतुर्थभक्ती ॥ब्रह्मता
ह्मणतीइतेचिपैं ॥ १७॥ हेंचिपैंगुरुमुखें
श्रवण ॥ करोनितयाचेंमनन ॥पाविजे
निजनिर्वाण॥ सहजींसहजपणनुरेतेथें
॥१८॥ इतिश्रीसहजबोधे ॥ गुरुशिष्य
संवादे॥ ठाकुरदासासिनुरोनिभेदे॥ नि
जानंदेंडुल्लत ॥ १९ ॥ इतिमहाकारण
निरसनंनामषष्ठमप्रकरणंसमाप्तं ॥६ ॥

---

श्रीएकनाथायनमः॥ ऐसेंआधीजाणा
वें ॥ मगतयासिसाधावें ॥ तेंचिकैसेंअ
भ्यासावें ॥ तेंपरिसावेंसावधपणें ॥१॥

शुद्धबुद्धजेंज्ञानघन ॥ स्वप्रकाशपरिपू
र्ण ॥ दृश्यद्रष्टादर्शन॥स्थानमाननसेज
या ॥ २॥ तेंआपणचिआपुल्याठायीं॥
संगत्यागेंपडेठायीं ॥ संगत्यागतोकैसा
कायीं ॥ आधींपाहीविचारूनी॥ ३ ॥
संगतोमुख्यप्रकृतीचा॥ त्यागावाआधी
तोसाचा ॥ परात्परस्वरूपाचा ॥ निर्धा
रत्याचाकळेमग ॥ ४ ॥ त्रिधाअसेप्रकृ
तिभेद॥ बोधाबोधविपरीतबोध ॥होय
जेणेंतिचाछेद ॥ तेंचिसावधपरियेसा॥
॥५॥ स्वरूपींजेंविस्मरण ॥ हेंचिअबो
धाचेंलक्षण ॥ मगदेहमीह्मणोन॥ स्फुरे
जाणविपरीततो ॥ ६ ॥ अबोधेंशींविप
रीतबोध॥जायझालियाआत्मबोध॥तो
होयजेणेंसावध॥परिसाबाधनुरेमग॥ ७॥

ईश्वराचेंनामस्मरण ॥ करितांशुद्धअंतः
करण ॥ होयहेसर्वत्रखुण ॥ वेदपुराण
गर्जती ॥ ८॥ भावेंकरितांभगवद्भजन॥
अगर्वेवंदिलियासंतजन ॥ सद्गुरुचरणीं
अनन्यशरण ॥ झालियाबंधननुरेचिपैं
॥९॥ ऐसाआचारजोकरील॥ तयासी
चज्ञानहोयील ॥ कैवल्यपदपावेल॥ब्र
ह्मताभोगीलस्वानंदें ॥ १० ॥ सद्गुरुकृ
पापरिपूर्ण॥ झालियालाभेखूण॥ त्या
चेंकरोनियांमनन॥ निदिध्यासनपावा
वें॥११॥तेचिआत्मखूणह्मणशीकैशी॥
तरीआतांचिपरियेशी॥ मीआत्मासर्व
साक्षीत्याशी ॥ संबंधदेहाशीअसेना ॥
॥१२॥ ऐसेंवेगळेपणेंजाणावें ॥ मगस
र्वहीआपणचिव्हावें ॥ काहींनहोनिअ

सावें॥ सहजस्वभावेंनिजींनिज॥ १३॥
निजींनाहींनिजपण ॥ हेचिआस्तिक
त्वाचीखुण ॥ ऐसेंजेंभासन॥ भातिजा
णह्मणतीतया ॥ १४ ॥ नाहींवृत्तीना
विषय ॥ दिसेनातेंजाणावेंकाय॥ तरी
स्वप्रीतिकदांनजाय ॥ ह्मणतीप्रियतया
शीपें ॥ १५ ॥ एवंअस्तिभातिप्रियप
ण ॥ हेचिआत्म्याचीत्रिधाखूण ॥ ना
मरूपतेमायाजाण ॥ याचेंलक्षणबोले
न ॥ १६ ॥ स्थूळाकारीदिसेजेंजें॥ अ
थवाकल्पनेंकल्पिजे ॥ तेंनामरूपहेंजा
णिजे॥ जाणतासहजेंवेगळाची॥ १७॥
वृत्तीचेंस्फुरणव्हावें ॥ तेणेंनामरूपक
ल्पावें ॥ तवतेंचिनाहींस्वभावें ॥ ऐसें
पहावेंआपणची ॥ १८ ॥ नामरूपआ

पुल्याठायीं॥ मुळींचकाहींझालेंनाहीं॥
वेगळेंमानावेंतेंकायी॥ सर्वहीपाहीआ
पणची ॥ १९ ॥ आधींवेगळेपणेंजा
णावें ॥ मगसर्वहीआपणचिव्हावें॥का
हींनहोनियांअसावें॥ सहजस्वभावेंउ
रेतें ॥ २० ॥ प्रळयोदकाचेमाझारी ॥
जेवींनदीनदानाहीउरी॥ तेवींध्येयध्या
ताध्यानहरी॥एकसरींप्रचितीये॥२१॥
दर्पणाचेनिआधारें॥ जेवींएकचिभा
सेदुसरें॥ तेंसारिलियामगनुरे॥ सहज
उरेनिजरूप॥२२॥ तेवीजाणिवेंतेंही
जाणोनी॥असिजेसर्वहीनेणोनी॥जा
णीवनेणीवनिरोधुनी ॥ सहजपणींनि
जींनिज ॥२३॥ मननकरितांयारीती॥
निदिध्यासेंचित्तवृत्ती ॥ स्थिरावोनिस

ठाणे.

हजस्थिती॥बाणेनिश्चितीपूर्णत्वें॥२४॥
यापरीअभ्यासकरितां ॥ नुरेमगद्वैतवा
र्त्ता ॥ दृश्यदृष्टीदेखतां ॥ देहीकथामग
नाहीं ॥२५॥ जेवींलवणउदकींधुतां॥
तेंउदकचिहोयतत्वता॥तेवींतीव्रअभ्या
सकरितां॥ चैतन्यताचित्ताशिपैं॥२६॥
असोहेंबहूतबोलणें ॥ यापरीअभ्यास
करणें ॥ तेणेंपरमपदपावणें ॥ अभ्या
सीजाणेयाखुणा ॥ २७ ॥ नित्यएकां
तींबैसोनी॥चित्तवृत्तीस्थिरकरोनी॥ सां
गीतलेंतेंसावधपणीं ॥ आणोनिध्यानीं
बैसावें ॥ २८ ॥ तेथेंजेकांवृत्तीस्फुरे ॥
तेसांडोनियांमाघारें ॥झालियातेमगनु
रे॥ निजनिर्धारेंजाणपां ॥२९ ॥ अथ
वास्फूर्त्तिस्फुरेजेजे ॥ तेंचैतन्याकारपा

हिजे ॥ मगकाहींनदिसेदुजें॥येणेंपावि
जेसहजस्थिती ॥३०॥ नमस्कारोनिस
द्गुरुमूर्त्ती ॥ ध्यानकरावेंयेणेंरिती ॥ का
हींनुरेद्वैतभ्रांती ॥ स्वानंदमूर्त्तीहोवोनि
ठाके ॥३१॥ इतिश्रीसहजबोधे ॥गुरु
शिष्यसंवादे ॥ ठाकुरदासानिजछंदें ॥
एकनाथदेपूर्णता ॥३२॥ इतिअभ्या
सयोगोनामसप्तमप्रकरणंसमाप्तं ॥ ७॥

---

श्रीएकनाथायनमः ॥ अभ्याससांगीत
लाजैसा॥ नित्यनेमेंसिकारितातैसा ॥स
हजस्थितीतोआपैसा ॥ पावेंकेसातेंसां
गूं ॥ १ ॥ निजध्यासलागेचित्तासी ॥
तेणेंविटेबाह्यविषयासी ॥ स्वस्थताबाणे
मगत्यासी ॥ अविनाशीहोवोनिराहे ॥

॥ २ ॥ सर्वगुह्यतमंभूयःऐसें ॥ ह्मणाव
याकारणहेंचिअसे ॥ माझेंपरमवाक्यहें
ऐसें॥सारनसेयापरतें ॥३॥ तेंचिदोंश्लो
कींकरुन॥ गुह्याचेंगुह्यनिवडून ॥ सांगि
तलेंतेणेंअर्जुन॥ समाधानपावला॥४॥
मन्मनाभवयाश्लोकीं ॥ मद्रूपहेंजगअ
वलोकी ॥ येणेंमातेंपावशीकीं ॥ एक
अनेकींदिसेना ॥ ५ ॥ अनेकींएकत्व
पाहावें ॥ कैसेंतेंचिसांगावें॥ ह्मणोनिस
र्वधर्मत्यागावे ॥ ऐसेंदेवेंनिरूपिलें ॥६॥
कवणतेसर्वधर्म ॥ आधीजाणावेंलागेव
र्म ॥ तेणेंबाणेनिजधर्म॥कांहींचश्रमनुरे
मग॥ ७॥मीदेहअथवामीब्रह्म॥हाअवघा
चिवृत्तिधर्म॥ कल्पनानुरतोनिर्धर्म॥ जा
णिजेवर्मसहजेंची ॥८॥निर्जीनाहींनि

जपण॥धर्माधर्मनिर्धर्मकोण॥जाणेल्या
सिद्धजेनविण॥सहजचिआपणअसेपैं॥
॥९॥गगनगगनींनिश्चळ॥ वायुवेगेंनव्हे
चंचळ ॥ मिथ्यावायूचीचळबळ ॥ व्यो
मकेवळआदिअंतीं॥१०॥ आदिअंतिं
जेकांअसे ॥ तेंजाणावेंसत्यऐसें ॥ मध्यें
जेंजेंकाहींभासे ॥ मृगांबुतैसेंमिथ्यापैं॥
॥११॥ मिथ्यातेंमिथ्याजाणावें ॥ सत्य
तेंसत्यमानावें॥मगउगेंचिपणीअसावें॥
निर्धर्मव्हावेंयारिती ॥ १२ ॥ एकपणे
विणअसिजे॥ तेसहजस्थितीजाणिजे॥
कांहींजाणिजेनानेणिजे ॥तरिउरिजेतें
सहज ॥ १३ ॥ असेंअस्फूर्तिपणेंची ॥
ऐसेंजाणेआपणची ॥ जाणीवनेणीव
यांची ॥ वार्ताकैंचीमगतेथें ॥ १४॥ म

गविश्वातेंपाहोंजाये॥ तंवतेआपणचि
होवोनिराहे॥ पाहावेंतेंकवणेंकाय॥
ऐसेंहोयतयामग॥ १५॥ ऐसातोयो
गेश्वरु॥ त्याचाकोणानकळेपारु॥राहे
निजात्मनिर्धारु॥सत्यसाचारुत्यापाशीं
॥१६॥ तोअसेजनांचिमाझारी॥जना
सारिखावर्तेजरी॥ मूर्त्तिमंततोश्रीहरी॥
जगदोद्धारीजाणावा॥ १७॥ तोजेजे
काहींबोलेबोल॥तेणेंजोडेअनिर्वाच्य
फळ॥ जयाचेंकांभाग्यप्रबळ॥ तोचि
निर्मळभजेतया॥१८॥ येरांनकळेत्या
चीस्थिती॥ तेसामान्यत्यातेंलेखिती॥
मंदभाग्यतेमूढमती॥ विश्वासचित्तींज
यांनाहीं ॥१९॥ हेअसोयोगींद्रस्तुती॥
करावयाकैंचीमती ॥ वर्णितांज्यांची

स्थिती ॥ मौनावतीश्रुतीजेथें ॥ २० ॥
स्वयेंचितेसच्चिदानंद॥ असोनिभजनीं
आनंद ॥ जरीनदिसेभेदाभेद॥ तरीछंद
जनतारावे ॥ २१ ॥ ह्मणूनिकरितीआ
चार॥ जनतरेजेणेंसाचार॥अंतरींबाणे
निर्धार ॥ परात्परस्वरूपाचा ॥२२॥ ते
कर्माकर्मीसदामुक्त ॥ जयासिकाहीं
नसेंद्वैत ॥ परमानंदमूर्तिमंत ॥ जाणनि
श्चितयोगिराज ॥ २३ ॥ तेआपणचि
आपण ॥ स्वप्रकाशेंपरिपूर्ण॥ होवोनि
स्वानंदघन ॥ निजींनिर्वाणपदींस्थिर॥
॥ २४॥ तयाचालतांबोलतां॥ स्फुरेनि
जअखंडता ॥ निजींनिजसहजता ॥
चैतन्यताचित्ताशिपैं ॥२५॥ वस्तुसिद्ध
चिजेस्वभावें ॥ तेंचितेमूर्तिजाणावें॥अ

सोहेंकायवर्णावें ॥ लिनव्हावेंतत्पदीं ॥
॥२६॥ इतिश्रीसहजबोधे ॥ गुरुशिष्य
संवादे ॥ ठाकुरदासेंनिजानंदें ॥ श्रीगुरु
पदेंवंदिलीं ॥२७॥ इतिसहजबोधेस्थि
तिवर्णनंनामअष्टमंप्रकरणंसमाप्तं ॥८॥

---

श्रीएकनाथायनमः ॥ जेंकांनित्यनिरं
जन॥निराकारजेंपरिपूर्ण ॥ जगहेंतेथें
विवर्त्तजाण ॥ अधिष्ठानजेंशुद्ध ॥१॥
उत्पत्तिस्थितीलय॥ भासवीपरीकाहीं
नहोय ॥ तेंवर्णितांमौनठाय ॥ कोण
कायवर्णवपु ॥ २ ॥ विश्वाचेंजेंजीव
न ॥ तयाह्मणतीनारायण ॥ तोचिज
गद्गुरूज्ञानघन ॥ जगहीजाणस्वयेंचि
जो ॥३॥ आपणचिशिष्यआणिगुरु॥

जगभासाआधारू ॥ नाहींजयापारा
वारु ॥ निजनिर्धारुविधीतो ॥ ४॥ जो
निजविधीचाजनिता ॥ तयालागिह्म
णतीविधाता ॥ जेथेंनाहींत्रिगुणता ॥
अत्रिस्वभावतानामतया ॥ ५ ॥ जेथें
नाहींगुणत्रय ॥ तेंचिदेतोदत्तात्रेय॥ ज
नींजनार्दनप्रगटहोय ॥ एकाएकींसो
यगुरुपदीं ॥ ६ ॥ एकींनाहींएकपण॥
त्याचेंकरितांवर्णन ॥ बाणेनिजींनिज
खुण ॥ सहजसंपूर्णजनवन ॥७ ॥ जो
अनाथाकरीसनाथ ॥ तयाशिह्मणती
एकनाथ ॥ मिथ्यापणींवारीअनर्थ॥नि
जपरमार्थस्वयेंदावी ॥ ८ ॥ श्रीएकना
थजीस्वयें ॥ ठाकुरदासआपणचिहोये
जेथेंकाहींहोयनाजाये ॥ दावीतपाय

निजभक्तां ॥ ९ ॥ श्रीसद्गुरुकृपापरिपू
र्ण ॥ तयाशीचबाणेहेखूण ॥ ह्मणोनि
करावेंसद्गुरुभजन ॥ निजनिर्वाणपावा
वया ॥ १० ॥ ग्रंथकर्त्ताश्रीएकनाथ॥
त्याचेंऐसेंमनोगत ॥ पठणश्रवणेंपरमा
र्थ ॥ पुरवूनिस्वस्थपदींठेवी ॥ ११ ॥ श्र
द्धायुक्तपठणकरितां ॥ निवारेत्याची
संसारव्यथा ॥ सद्भावेंशिमननकरितां॥
निजहितार्थाकांनमिळे ॥ १२ ॥ ह्म
णोनियाग्रंथींजयाभक्ती ॥ तयाशिप
रमानंदमूर्त्ती॥ भेटेलचिनिजनिश्चिती॥
कैवल्यपतीश्रीगुरु ॥ १३ ॥ काहींनबो
लणेंहेगुरुभक्ती ॥ काहींनहोनिअसणें
तेस्थिती ॥ नैष्कर्म्यसिद्धीयातेंचिह्मण
ती ॥ सन्यासेंप्राप्तीहोययाची ॥ १४ ॥

शरीरींकर्मतेंकायिक॥ वाचाबोलेतेंवा
चिक ॥ कल्पनाकल्पीतेंमानसिक॥ नै
ष्कर्म्यदेखनोहेचितें ॥ १५ ॥ नकल्पि
तांचिसिद्धआहे ॥ कल्पनात्यागेंप्राप्ती
होये ॥ संकल्पाचासन्यासपाहें ॥ तो
चिआहेनिजवस्तू ॥ १६ ॥ मौनेंचित
यावानिजे॥ अतिप्रियपणेंचिभजिजे॥
हेंचिभक्तिचेंरूपजाणिजे ॥ काहींचनु
रिजेदुजेपणें ॥ १७॥ तेचिभक्तीनव
विध ॥ परीतेवस्तुशुद्धबुद्ध॥ अखंडजें
कांअभेद॥ परमानंदनिजभक्ती॥१८॥
अखंडजेकांप्रियपण॥तेचिस्मरणभक्ती
जाण ॥ मायारमाहोऊन ॥ स्थिरावेते
जाणपूर्णपादसेवा ॥ १९ ॥ वाच्यवा
चकआणिवचन॥ तेआपणचिआहेज

नार्दन ॥ ह्मणोनिश्रोताआणिश्रवण ॥
आहेपरिपूर्णनिजभक्ती ॥ २०॥ शिव
होऊनिशिवभजन॥ तेंचिप्रियाचेंअर्च
न ॥ परमसुखतेवंदन॥ जनार्दनदिसेजे
णें॥२१॥ स्वामीचेजेमनोगत॥ तेचिप
रमप्रियहित ॥ दास्यभक्तिसुनिश्चित ॥
जाणअखंडसुखदात्री॥२२॥ परमात्मा
जोनिजानंद ॥ तयाचानिर्निमित्तजो
छंद॥ तेथेंकाहींनुरेभेद॥ सख्यनिर्द्वंद्वभ
क्तीतें ॥२३॥ आपणकाहींचनउरावें॥
तेंआत्मनिवेदनजाणावें ॥ परमानंदेंचि
असावें ॥ सहजस्वभावेंनिजींनिज ॥
॥२४॥निर्निमित्तजेंप्रियपण॥ सर्वभूतीं
असेजाण॥ तेचिभक्तीआनंदघन ॥दि
सेजनार्दननिजभक्तां ॥२५॥ भज्यभ

जनभक्तपण ॥ एकचिआहेजनार्दन॥
एकींएकपणेंविण ॥ आनंदघननिज
पूर्ण ॥ २६ ॥ ऐसेंजेजेंकाहींबोलावें॥
तेणेंबोलकेपणेंवर्णावें ॥ तैसेंनोहेह्मणो
निअसावें ॥ मौनभावेंतेस्तुती ॥ २७॥
जयापाहतांमौनपडे ॥ तेचिवस्तूवाडे
कोडें ॥ बोलतांहिमौननमोडे ॥ सर्वत्र
जोडेनिजवस्तु ॥ २८ ॥ जेथेंकाहींक
रणेंनकरणें ॥ नाहींतयाकोणकैसेंह्म
णे ॥ जेसर्वदांचिसर्वपणें ॥ काहींचहो
णेंनाहींजया ॥ २९ ॥ काहींचनहोणे
हेंचिसेवा ॥ आवडेश्रीगुरुदेवदेवा॥ नि
रसोनियांभेदभावा ॥ सहजस्वभावा
अनुसरावें ॥ ३० ॥ तेणेंबाणेस्वानुभ
व ॥ जैसानिजवस्तूचास्वभाव ॥ तैसा

चिहोयप्रकृतिभाव ॥ भावाभावनुरेम
ग ॥ ३१ ॥ तेंवानावेंकैसेरिती ॥ जेथें
नाहींनिंदास्तुती॥ नाहींदिवसनाराती॥
स्वयंज्योतीसदोदित ॥ ३२ ॥ आतां
काहींनवानुं ॥ देहींनसाहेजनार्दनु ॥
वानूंनवानूंह्मणेकवणु ॥ नुरेअभिमानु
जयाठायीं ॥ ३३ ॥ ह्मणूनआतांका
हींनकरूं ॥ ऐसेंजाणोनिमौनधरूं ॥ ते
थेंहिप्रगटेश्रीगुरू॥ सर्वांधारूसहजची॥
॥ ३४ ॥ तोचिचालताबोलता ॥ तो
चिमीपणेंस्फुरता ॥ तोचिविचाराअंत
वता॥ माजीस्वस्थतास्वयेंदावी ॥३५॥
दावीआपणाआपण ॥ परीकाहींनदि
सेमीतूंपण ॥ सहजचिआहेपरिपूर्ण ॥
एकजनार्दनजनींवनीं॥३६॥ध्येयध्या

ताआणिध्यान ॥ बुडेजेथेंतेंनिरंजन ॥
परमशांतिज्ञानाज्ञान ॥ विरोनिनिर्वाण
दिसेसर्व ॥ ३७ ॥ ह्मणोनमीपणेंबोलि
जे ॥ तेंहीजनार्दनचिहोइजे ॥ होइजे
नाजाइजे॥ सहजसहजेंनिरंतर ॥३८॥
सर्वशून्यजेथेंहोये॥तेथेंशुद्धवस्तूचिआ
हे॥ तेथेंपाहेकोणकाये ॥ नदिसेतेआहे
निजवस्तू ॥३९॥ दिसणेनसींदेखणें ॥
हारपोनिसर्वहोणें ॥ ऐसेंश्रीगुरूचेंकर
णें॥करणेंनकरणेंनुरेमग ॥ ४० ॥ आ
पणकाहींनहोऊन ॥ असणेंतेंश्रीगुरुपू
जन ॥ सूक्ष्मपूजाहेचिजाण ॥ बाह्यसे
वनतेंकैसें ॥ ४१ ॥ श्रीगुरूचीमूर्तिते ॥
चैतन्यघनजाणते ॥ उपासिजेकवणेरी
तीतें ॥ तुच्छकैवल्यातेंमानुनी ॥४२॥

ज्याच्याचरणरजप्रसादें ॥ सहजस्थिती
स्वानंदें ॥ बाणोनियांपरमानंदें॥ निज
छंदेंराहिजे ॥ ४३ ॥ तेचरणसेवादुर्लभ
जेणेंकैवल्यपदसुलभ॥झालेंतोपरमला
भ ॥ नोहेसुलभचरणसेवा॥ ४४॥ तेसे
वाकरावयाजगीं॥सामर्थ्यनसेकवणाचे
आंगीं॥ अर्पणकरावयालागीं॥ पदार्थ
जगींअसेना॥४५॥ पदार्थींनसेपदार्थप
ण ॥ विश्वाकारेंजनार्दन॥दिसेमगजेंअ
र्पण ॥ करावेंतेजाणतोचिआहे॥४६ ॥
तत्प्रसादेंलाभपूर्ण ॥ झालातोअविनाश
जाण ॥ करुणामूर्तिचेंदर्शन ॥दुर्लभखू
णजाणावी ॥ ४७॥ सर्वभावेंश्रीगुरुमू
र्त्ती ॥ उपासावीयथार्थनिगुती ॥तुच्छ
मानूनिसहजस्थिती ॥ चरणतीर्थीधरी

निष्ठा ॥४८॥ श्रीगुरुसेवावर्णिली ॥ ते
मजकांहींचनाहींघडली ॥आस्थाएक
चिराहिली ॥ पाहिजेपुरविलीगुरुरायें
॥ ४९ ॥ इतिश्रीसहजबोधे ॥ गुरुशि
ष्यसंवादे ॥ ठाकुरदासासिनिजपदें ॥
दास्यछंदेंदाखवी ॥ ५० ॥ शकेसत्रा
शेंसत्तावीस ॥ ज्येष्ठमासमध्यदिवस ॥
गुरुवारीमाध्यान्हीस ॥ ग्रंथनाथासस
मर्पिला॥५१॥ इतिश्रीसहजबोधेश्रीगु
रुस्तवनंनामनवमप्रकरणंसंपूर्णमस्तु ॥
॥ श्रीनाथार्पणमस्तु ॥ एकंदरओव्यां
चीसंख्या ॥ २५७॥ ॥छ॥ ॥छ॥